माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
### माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००६८४**

**अपिलार्थी श्री. संतोषकुमार गुलाबचंद यादव**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी (पणन),**
कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०४.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २४.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०९.२०२४ | | २३.१२.२०२४ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. २३.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "मा. अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पू.उ. यांचे दालनात कुर्ला महानंदा नगर गृह. संस्था मधील अनु. क्र. ११५ वरील श्री. गुलाबचंद सभाचंद यादव या चुकीच्या नावाची दुरुस्ती व पात्रतेसंदर्भात सुरु असलेल्या सर्व्हे मध्ये श्रीमती उर्मिलादेवी जवाहीर यादव यांनी सदर प्रकरणामध्ये दिलेले सर्व पत्रांच्या साक्षांकित प्रती मिळणे.*
*(२) तसेच सदर अर्जाच्या अनुषंगाने आपण दिलेले उत्तर पत्रांची साक्षांकित प्रत मिळणे."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. २३.१२.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २७.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, श्री. संतोष कुमार गुलाबचंद यादव यांनी दि. २३.०९.२०२४ च्या पत्रान्वये मा. अप्पर जिल्हाधिकारी (अति /निष्का) पू.उ. यांचे दालनात कुर्ला महानंदा नगर सह. गृह. संस्था मधील अनु. क्र. ११५ वरील श्री.

..२/-

गुलाबचंद सभाचंद यादव या चुकीच्या नावाची दुरुस्ती व पात्रतेसंदर्भात सुरु असलेल्या सर्व्हे मध्ये श्रीमती. उर्मिलादेवी जवाहीर यादव यांनी सदर प्रकरणामध्ये दिलेले सर्व पत्रांच्या साक्षांकित प्रती मिळणे तसेच सदर अर्जाच्या अनुषंगाने आपण दिलेले उत्तर पत्रांची साक्षांकित प्रत मिळणेबाबत विनंती केली होती. तरी सदर प्रकरणी दि. १०.०१.२०२४ पासून दि. १६.०४.२०२५ रोजी पर्यंत या कार्यालयात सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी अपिलार्थी हे देखील पक्षकार असल्याचे उपलब्ध नस्तीतून दिसून येते.

अपिलार्थी यांनी मागीतलेल्या माहितीच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. वसंत गोसावी यांनी श्रीमती. उर्मिलादेवी जवाहीर यादव यांची व्यक्तीगत कागदपत्रे उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त नाही, असे अपिलार्थी श्री. संतोष कुमार यादव यांना मौखिकरित्या कळविल्याचे सांगितले. तरी सदर प्रकरणी उपलब्ध नस्तीनुसार दिसून येते की, अर्जदार यांनी नमुद केलेल्या प्रकरणी मा. सक्षम प्राधिकारी यांनी दि. १८.०७.२०२५ रोजी आदेश पारित केले आहेत व सदर आदेशाची प्रत अपिलार्थी यांना देण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी या कार्यालयामार्फत निर्गमित केलेल्या परि-२ ची छायांकित प्रत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सादर केले की, जेव्हा अपिलार्थी यांनी माहिती अर्ज सादर केला तेव्हा सदर प्रकरणी पात्रता विषयी सुनावणी सुरु होती. त्यामुळे अपिलार्थीना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु आता पात्रता विषयी निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे संबंधीतांनी पात्रतेसाठी दाखल केलेले अभिलेख वगळता परिशिष्ट- २ ची प्रत देणे शक्य आहे.

५. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यापुढे अनुक्रमे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थींना विहित वेळेत उत्तर/ माहिती तसेच सुनावणी घेऊन आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केल्याप्रमाणे परिशिष्ट- २ ची प्रत संलग्न करुन वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ३०.०४.२०२६**

30-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**